**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**
**कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय**
**गट ड भरतीच्या लेखी परीक्षेसाठी प्रश्नपुस्तिका**
**मराठी, सामान्य ज्ञान व अंकगणित**

| संच | B |
|---|---|

| प्रश्नपत्रिका क्र. | 225138 |
|---|---|

परीक्षा दिनांक : २२/११/२०१५

वेळ : ०१.०० ते ०२.३० (९० मिनिटे)

| एकूण प्रश्न | ७५ |
|---|---|
| सत्र : | २ रे |

| एकूण पृष्ठे | १६ |
|---|---|

## सूचना

1. सदर प्रश्नपुस्तिकेत ७५ अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापुर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.
2. आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.
3. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**
4. या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना A, B, C आणि D असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करुन दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.
   **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरु नये.**
5. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.
6. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.
7. **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार पर्याय उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या चुकीच्या उत्तरांसाठी गुण वजा करण्यात येणार नाहीत".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विभागाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका विभागाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत / प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरुपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि / किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**


**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती विभागाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीय वृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या शेवटच्या पृष्ठावर पहा

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

## भाग - 1 : मराठी

1. खालील शब्दकोडे पूर्ण करण्यासाठी अचूक पर्याय निवडा :




(A) द, भ, कु
(B) द, ल, ह
(C) भ, म, य
(D) भ, ओ, द

*खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांचे योग्य पर्याय निवडा :* **(प्रश्न-क्रमांक 2 से 4)**

समाजरत्ने ! समाजाच्या उद्धारासाठी आयुष्यभर झटणारी माणसे ही समाजातील रत्नेच आहेत. महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, बाबा आमटे अशी अनेक थोर व्यक्तिमत्वे आपल्या डोळ्यांसमोर उभी राहतात. बाबा आमटेंचे जीवन तर एका महारोग्याला पाहून पूर्णतः बदलून गेले. यातूनच पुढे त्यांनी 'आनंदवना'ची स्थापना केली. समाजातील स्त्रिया, उपेक्षित लोक, पीडित व्यक्ती यांच्या उद्धारासाठी काम करणारे हे महान लोकनेतेच आहेत. सामान्य कुटुंबात जन्माला येऊन असामान्य कर्तृत्व गाजवणाऱ्या थोर व्यक्तित्वांचा आदर्श प्रत्येक नागरिकाने घेतला पाहिजे.

2. वरील उताऱ्यामध्ये कोणत्या समाजसेवकाचे नाव आले नाही ?

(A) महात्मा फुले
(B) डॉ. आंबेडकर
(C) डॉ. विकास आमटे
(D) बाबा आमटे

3. खालीलपैकी कोणत्या शब्दाचा विरुद्ध अर्थाचा शब्द उताऱ्यामध्ये आलेला नाही ?

(A) मृत्यु (B) अपेक्षित (C) असामान्य (D) कर्तृत्व

4. 'समाजरत्ने' कोणाला म्हटले आहे ?

(A) समाजात राहून रत्ने वापरणारे लोक.
(B) समाजाच्या उन्नतीसाठी आयुष्य वेचणारे लोक.
(C) समाजोद्धारासाठी विविध रत्ने जमवणारे लोक.
(D) समाजासाठी रत्ने असणारे लोक.

5. दर सहा महिन्यांनी प्रकाशित होणारे नियतकालिक म्हणजे ________ होय. (रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा)

(A) सहामाही
(B) षष्ठमासिक
(C) षण्मासिक
(D) अर्ध प्रकाशित

6. खाली दिलेल्या शब्दासाठी विरुद्धार्थी शब्दाचा पर्याय खालीलपैकी कोणता ?

'उन्नती' ×

(A) प्रणती
(B) अनोन्नती
(C) अवनती
(D) प्रगती

7. खाली दिलेली ध्वनिप्रदूषणाशी संबंधित घोषणा पूर्ण करण्यासाठी योग्य पर्याय निवडा :

*नका लावू ........... भिंती ।*
*बंद पडेल हृदयाची गती ॥*

(A) पर्यावरणाच्या (B) श्वासाच्या (C) आरोग्याच्या (D) आवाजाच्या

8. खालील शब्द वर्णमालेच्या योग्य क्रमानुसार लावल्यास मध्यभागी कोणता पर्याय येईल ?

*प्रस्थान, प्रामाणिक, प्रयत्न, प्रवास, प्रांत*

(A) प्रवास
(B) प्रस्थान
(C) प्रामाणिक
(D) प्रयत्न

9. खालीलपैकी विशेषण नसलेला पर्याय ओळखा :

(A) हास्य
(B) मधुर
(C) सुगंधी
(D) बोचरी

10. खालीलपैकी नपुंसकलिंगी शब्दाचा योग्य पर्याय ओळखा :

(A) नाविक
(B) फुलपाखरू
(C) डास
(D) माशी

11. 'केशवकुमार' हे नाव खालीलपैकी कोणाचे आहे ?

(A) राम गणेश गडकरी

(B) कृष्णाजी केशव दामले

(C) ग. दि. माडगूळकर

(D) प्रल्हाद केशव अत्रे

12. 'सूरज अधिकारी बनला.' या वाक्याचे भविष्यकाळी रूप कोणते ?

(A) सूरज अधिकारी बनला होता.

(B) सूरज अधिकारी बनतो.

(C) सूरज अधिकारी बनेल

(D) सूरज अधिकारी बनत असतो

13. जसे, कोल्हयाची - कोल्हेकुई; तशी, वाघाची - ?

(A) गर्जना

(B) डरकाळी

(C) आरोळी

(D) किंकाळी

14. खालील नामासाठी योग्य सर्वनाम पर्यायांतून निवडा :

*'फूल'*

(A) तुम्ही

(B) आम्ही

(C) आमच्या

(D) ते

15. र, ब, क, त या अक्षरांपासून तयार होणाऱ्या अर्थपूर्ण शब्दाच्या विरूद्ध अर्थाचा शब्द खालीलपैकी कोणता ?

(A) नुकसान

(B) चढाई

(C) लाभ

(D) उतरण

16. 'घोडा' या नामाचा पिलूदर्शक शब्द असलेला योग्य पर्याय खालीलपैकी कोणता ?

(A) पिलू
(B) बछडा
(C) वासरू
(D) शिंगरू

17. दिलेल्या अर्थाची म्हण खालीलपैकी कोणती ?

'मूर्खाला नको ते अधिकार देणे.'

(A) वासरात लंगडी गाय शहाणी
(B) गोगलगाय नि पोटात पाय
(C) माकडाच्या हातात कोलीत
(D) भरवशाच्या म्हशीला टोणगा

18. खालीलपैकी अशुद्ध शब्दाचा पर्याय ओळखा :

(A) शौर्य
(B) संर्वधन
(C) राष्ट्रीय
(D) पुरस्कार

19. 'त्र्यंबक बापूजी ढोंबरे' हे कोणत्या नावाने कविता लिहित असत ?

(A) आनंदघन
(B) केशवसुत
(C) बालकवी
(D) बी

20. खालील वाक्यामध्ये येणाऱ्या वाक्प्रचाराचा पर्याय क्रमांक निवडा :

*भारताने सामना जिंकल्या बरोबर सर्वांनी एकच* ________.

(A) गोल केला
(B) जल्लोष केला
(C) पळ काढला
(D) बोंब मारली

21. खालील वाक्यात कोणते विरामचिन्ह दयावयाचे राहिले आहे ?

*"आई तुझ्या ऋणांतून मुक्त होणे अशक्य आहे."*

(A) उद्गारचिन्ह
(B) अर्धविराम
(C) स्वल्पविराम
(D) पूर्णविराम

22. दिलेल्या नामाचे निश्चितपणे अनेकवचनी रूप ओळखा :

*माळा* -

(A) माळे (B) माळ

(C) माळी (D) माळा

23. गटात न बसणारा पर्याय ओळखा :

(A) रत्नाकर (B) सविता

(C) सिंधू (D) सागर

24. अधोरेखित शब्दाचा योग्य अर्थ असलेला पर्याय निवडा :

*ताठ <u>मानेने</u> मिळालेला मान स्वीकारा*

(A) शरीराचा एक अवयव (B) म्यान

(C) आडनाव (D) सत्कार

25. आईला पत्र लिहिताना खालीलपैकी कोणता मायना लिहाल ?

(A) तीर्थस्वरुप (B) माननीय

(C) गुरुवर्य (D) तीर्थरुप

**भाग - 2 : सामान्य ज्ञान**

26. भारतीय संसदेचे 'कनिष्ठ' सभागृह कोणते ?

(A) लोकसभा (B) राज्यसभा

(C) विधानपरिषद (D) विधानसभा

27. शिवाजी महाराजांचा निष्ठावंत पाईक म्हणून खालील पर्यायांपैकी कोणाचा समावेश होईल ?

(A) सिद्दी जोहर (B) सिद्दी मसऊद

(C) सिद्दी मिसरी (D) सलाबतखान

**28.** पेंच राष्ट्रीय उद्यान महाराष्ट्रात कोणत्या जिल्ह्यात आहे ?

(A) गोंदिया
(B) नागपूर
(C) चंद्रपूर
(D) नवी मुंबई

**29.** ग्रामसभा बोलावण्याची जबाबदारी कोणावर असते ?

(A) ग्रामसेवक
(B) सरपंच
(C) तलाठी
(D) गट विकास अधिकारी

**30.** एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धा सर्वाधिक वेळा जिंकणारा देश कोणता ?

(A) वेस्टइंडिज
(B) ऑस्ट्रेलिया
(C) भारत
(D) इंग्लंड

**31.** HIV बाबत जनमानसात जागरुकता वाढविण्यासाठी दरवर्षी कोणता दिवस 'जागतिक एड्स दिवस' म्हणून पाळला जातो ?

(A) 1 डिसेंबर
(B) 1 जानेवारी
(C) 1 मे
(D) 11 ऑगस्ट

**32.** खालील पर्यायांपैकी योग्य विधान कोणते ?

(A) सूर्याच्या उष्णतेने जमीन लवकर तापते व उशिरा थंड होते.

(B) सूर्याच्या उष्णतेने जमीन उशिरा तापते व लवकर थंड होते.

(C) सूर्याच्या उष्णतेने पाणी लवकर तापते व सावकाश थंड होते.

(D) सूर्याच्या उष्णतेने पाणी उशिरा तापते व सावकाश थंड होते.

**33.** शिवरायांच्या अष्टप्रधानांबाबत योग्य विधानाचा पर्याय कोणता ?

(A) पंडितराव व न्यायाधीश यांना युद्धप्रसंग करावे लागत.

(B) प्रधानांना इनामे व वतने दिली जात.

(C) प्रधानांना रोख पगार भरपूर दिला जात असे.

(D) सचिव व सुमंत यांना युद्धप्रसंग करावे लागत नव्हते.

34. जागतिक वारसा स्थळ यादीत महाराष्ट्रातील खालीलपैकी कोणत्या स्थळांचा समावेश होतो ?

(अ) कास पठार (सातारा)

(ब) छत्रपती शिवाजी टर्मिनस (मुंबई)

(क) आगाखान पॅलेस (पुणे)

(A) फक्त 'अ' आणि 'ब'
(B) फक्त 'ब' आणि 'क'
(C) फक्त 'अ' आणि 'क'
(D) तिन्ही 'अ', 'ब' आणि 'क'

35. खालील पर्यायांपैकी कोणता अवयव पचनसंस्थेशी संबंधित आहे ?

(A) केशिका
(B) वृक्क
(C) ग्रासिका
(D) चेतारज्जू

36. खालीलपर्यायांपैकी भूईकोट किल्ला कोणता ?

(A) नळ्दूर्ग
(B) विजयदूर्ग
(C) अजिंक्यतारा
(D) जयगड

37. जिल्हापरिषद प्रशासनाचे प्रमुख कोण असतात ?

(A) जिल्हाधिकारी
(B) जिल्हा परिषद अध्यक्ष
(C) जिल्हा आरोग्य अधिकारी
(D) मुख्य कार्यकारी अधिकारी

38. शिवाजी महाराजांच्या मुलकी व्यवस्थेतील गावपातळीवरील अधिकारी खालील पर्यायांपैकी कोणता ?

(A) सबनीस
(B) कुलकर्णी
(C) किल्लेदार
(D) कारखानीस

39. 'एडवर्ड जेन्नर' या शास्त्रज्ञाने कोणत्या रोगाची लस शोधून काढली ?

(A) पोलिओ
(B) देवी
(C) क्षयरोग
(D) धनुर्वात

40. भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांची समाधी कोठे आहे ?

(A) गुरुदासपूर
(B) जालियानवाला बाग
(C) लाहोर
(D) फिरोजपूर

41. अमरावती जिल्ह्यातील प्रमुख आदिवासी जमात कोणती ?

(A) वारली
(B) महादेव कोळी
(C) कोरकू
(D) ठाकर

42. सामान्यत: रक्तदान करताना प्रत्येकवेळी किती मिलीपर्यंत रक्तदान करता येते ?

(A) 200 मिली.
(B) 400 मिली.
(C) 300 मिली.
(D) 500 मिली.

43. 'मुहम्मद कुलीखान' - नाव खालील पर्यायांपैकी कोणाला देण्यात आले होते ?

(A) प्रतापराव गुजर
(B) नेतोजीपालकर
(C) काझीहैदर
(D) बजाजी निंबाळकर

44. 'ब्रिक्स' (BRICS) या आंतरराष्ट्रीय समूहातील 'B' हे अक्षर कोणत्या देशासाठी आहे ?

(A) बांग्लादेश
(B) भूतान
(C) ब्राझील
(D) भारत

45. 'स्टेनलेस स्टील' हे कोणत्या दोन धातुंचे मिश्रण आहे ?

(A) क्रोमिअम + लोखंड
(B) जस्त + तांबे
(C) लोखंड + कार्बन
(D) क्रोमिअम + तांबे

46. खालील पर्यायांपैकी नदी - उपनदी यांची अयोग्य जोडी कोणती ?

(A) तापी - मांजरा
(B) भीमा - नीरा
(C) कृष्णा - पंचगंगा
(D) गोदावरी - प्राणहिता

47. खालील पर्यायांपैकी 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार प्राप्त महिला कोण ?

(A) सुलोचना लाटकर
(B) शोभना समर्थ
(C) मधु कांबीकर
(D) मेघा पाटकर

48. 'डी' जीवनसत्त्वाच्या सततच्या अभावामुळे खालील पर्यायांपैकी कोणता आजार होतो ?

(A) स्कर्व्ही
(B) रातांधळेपणा
(C) मुडदूस
(D) लकवा

49. मुघल बादशाहा औरंगजेब आणि शायिस्ताखान यांच्यातील नाते कोणते ?

(A) भाचा व मामा
(B) मामेभाऊ
(C) सावत्रभाऊ
(D) जावई व सासरा

50. जास्त पावसाच्या प्रदेशात घेतले जाणारे पीक कोणते ?

(A) सोयाबीन
(B) गहू
(C) मटकी
(D) वरई

## भाग - 3 : अंकगणित

51. कवायतीसाठी मैदानावर 441 मुले उभी आहेत. जर प्रत्येक रांगेत उभ्या असलेल्या मुलांच्या संख्येइतक्याच रांगा असतील; तर रांगांची संख्या किती ?

(A) 21 (B) 19 (C) 23 (D) 17

52. खालील संख्यामालिकेत प्रश्न चिन्हाच्या जागी येणारे पद कोणते ?

4, 16, 36, ?, 100, 144

(A) 49 (B) 25 (C) 64 (D) 84

53. 2:50 वाजता घड्याळातील तासकाटा व मिनिटकाटा यांच्यात होणारा कोन कोणत्या प्रकारचा असेल ?

(A) लघुकोन
(B) काटकोन
(C) विशालकोन
(D) कोटीकोन

**54.** मानसी कडे 8400 रुपये होते त्यापैकी तिने त्या रकमेच्या $\frac{3}{5}$ भाग रक्कम खर्च केली. तर उरलेली रक्कम किती रुपये असेल ?

(A) 3360 (B) 1680 (C) 5040 (D) 6720

**55.** $4\frac{3}{4}$ची आठ पट = किती ?

(A) 24 (B) $16\frac{3}{4}$ (C) 38 (D) 152

**56.** 3250 या संख्येचे योग्य वाचन खालीलपैकी कोणते ?

(अ) सव्वातीन हजार

(ब) साडे बत्तीसशे

(क) तीन हजार दोनशेपन्नास

(A) फक्त 'अ' आणि 'ब'

(B) फक्त 'ब' आणि 'क'

(C) फक्त 'अ' आणि 'क'

(D) तिन्ही 'अ', 'ब' आणि 'क'

**57.** एक पुस्तक आणि एक वही यांची एकूण किंमत 87 आहे. जर पुस्तकपेक्षा वही 5 रुपयांनी महाग आहे; तर तीन वहयांची किंमत किती रुपये ?

(A) 41 (B) 138 (C) 46 (D) 123


**58.** 3 मी. लांबीची तार पाच ठिकाणी कापली व समान मापाचे तुकडे तयार केले; तर प्रत्येक तुकडयाची लांबी किती सेमी. ?

(A) 60 (B) 50 (C) 55 (D) 65

59. 5 + 55 + 555 + __________ + 55555555 अशाप्रकारे असलेल्या संख्यांची बेरीज केली तर बेरजेच्या शतकस्थानचा अंक कोणता असेल ?

(A) 7 (B) 3 (C) 6 (D) 4

60. शेजारील वर्तुळावरील दर्शविलेले सर्व बिंदु परस्परांशी एकेकदा जोडून जास्तीत जास्त किती रेषाखंड काढता येतील ?




(A) 15 (B) 10 (C) 12 (D) 20

61. दोन पेटयात 18 पेरू मावतात याप्रमाणे 12 डझन पेरू ठेवायला किती पेट्या लागतील ?

(A) 9 (B) 8 (C) 16 (D) 18

62. खालीलपैकी सर्वात लहान अपूर्णांक दर्शविणारा पर्याय कोणता ?

(A) $\frac{7}{9}$ (B) $\frac{5}{8}$ (C) $\frac{3}{5}$ (D) $\frac{4}{7}$

63. (4.25 तास) = किती मिनिटे ?

(A) 425 (B) 265 (C) 255 (D) 415


64. 4, 7 आणि 5 यातील प्रत्येक अंक एकेकदाच वापरून जास्तीत जास्त किती संख्या तयार करता येतील ?

(A) चार (B) तीन (C) सात (D) सहा

65. $\left(\frac{8}{1000} + 2 \times 10 + \frac{3}{10}\right)$ म्हणजे कोणती संख्या ?

(A) 2.308 (B) 20.38 (C) 20.830 (D) 20.308

66. शेजारील आकृतीतील चौकोनांची संख्या किती ?



(A) 4 (B) 5 (C) 3 (D) 6

67. $8 + 12 \times 6 =$ किती ?

(A) 120 (B) 80 (C) 72 (D) 92

68. खालील पर्यायांत दर्शविलेल्या संख्येइतक्या वस्तू काही मुलांना समान वाटायच्या असतील; तर कोणत्या वस्तूंचे समान वाटप होणार नाही ?

(A) 91 (B) 111 (C) 141 (D) 131

69. 75 मी. लांब व 60 मी. रुंद असलेल्या आयताकृती बागेच्या कडेने समीरने चार फेऱ्या मारल्या; तर तो किती मीटर अंतर चालला ?

(A) 540 (B) 1080 (C) 810 (D) 1000

70. 19 ऑक्टोबरला शुक्रवार आहे; तर त्याच महिन्यात कोणता वार पाच वेळा येणार नाही ?

(A) गुरुवार (B) बुधवार (C) मंगळवार (D) सोमवार


71. 24086 या संख्येतील सर्वात जास्त स्थानिक किंमत असणारा अंक आणि सर्वात कमी स्थानिक किंमत असणारा अंक यांच्या स्थानिक किंमतीची बेरीज किती ?

(A) 20006 (B) 20000 (C) 86 (D) 20080

72. 13 मी. बाजू असलेल्या चौरसाकृती मैदानाचे क्षेत्रफळ किती चौ. मीटर असेल ?

(A) 117 (B) 130 (C) 169 (D) 143

**73.** शेजारी दिलेल्या घडणीमधील रेघांनुसार घड्या घातल्या व जुळवून खोके तयार केले, तर 'T' पृष्ठाच्या विरुद्ध पृष्ठावर कोणते अक्षर असेल ?




(A) R (B) S (C) U (D) P

**74.** 142चा संख्येआधी क्रमाने असणारी 12वी विषम संख्या कोणती ?

(A) 117 (B) 139 (C) 119 (D) 139

**75.** एका पाकीटात रु. 50, रु 20 आणि रु. 100 किमतीच्या समान नोटा आहेत. जर पाकीटात 2550 रुपये असतील तर नोटांची एकूण संख्या किती ?

(A) 15 (B) 30 (C) 60 (D) 45

---

## सूचना : (पृष्ठ 1 वरुन पुढे...)

8. प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरीक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनयम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

9. सदर प्रश्नपत्रिकेसाठी विभागाच्या विहित केलेली वेळ संपल्यानंतर वा संपण्यापुर्वी उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी नाही. **परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपली प्रश्नपुस्तिका व आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-१ (विभागाची प्रत) पर्यवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

**नमूना प्रश्न :**

प्र.क्र. 76 "तितिक्षा" या शब्दासाठी योग्य शब्दसमूह कोणता ?

(A) केलेले उपकार जाणणारा. (B) हाल अपेष्टा सहन करण्याचा गुण.

(C) केलेले उपकार न जाणणारा. (D) जाणून घेण्याची इच्छा असणारा.

या प्रश्नाचे योग्य उत्तर "(B) हालअपेष्टा सहन करण्याचा गुण" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(B)" होईल यास्तव खालील प्रमाणे प्रश्न क्र. 76 मधील उत्तर क्र. "Ⓑ" हे वर्तुळ पुर्णपणे छायांकित करुन दाखविणे आवश्यक आहे.

○ ● ○ ○ ⊘ ⊗ ⊙ ◐

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररित्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरली त्या-त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पुर्णपणे छायांकित करुन दाखवावा. हयाकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरु नये.

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**